सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(१)/२०२२/तेवीस दिनांक : २४ जानेवारी, २०२४.

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :-** **महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा - २०२२** गुणपत्रक, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत **(Retotaling)**
**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ०३५/२०२३.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा - २०२२ या परीक्षेतील सहायक कक्ष अधिकारी संवर्गाच्या लेखी परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत निकालाद्वारे अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "ONLINE FACILITIES" मधील "View Marksheet" या वेबलिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotaling) करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "ONLINE FACILITIES" मधील "Retotaling of Marks" या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉगीन करावे.

(४) "Retotaling" संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रकातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या विषयाची निवड करून Save बटनवर क्लिक करावे.

(६) सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पद्धतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक २४ जानेवारी, २०२४, १२.०० ते दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ ; २३.५९ वाजेपर्यंत सुरू राहील.

**४.** उपरोक्त कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**उपसचिव(परीक्षोत्तर)(अराजपत्रित)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**ठिकाण** : नवी मुंबई